MHAH020032642022

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३६३/२०२२</u>**

रविंद्र सुंदरराव मेढे वगैरे

विरूद्ध

लतिका शिवराम निकाळजे

## <u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>

(दिनांक – २०.०३.२०२३)

सदरचा अर्ज हा भारतीय वारसा कायद्याच्या कलम ३७२ अन्वये वारसाहक्क प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दाखल केला आहे.

२) अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे की, मयत सुंदरराव कृष्णाजी मेढे हे त्यांचे आणि गैरअर्जदार यांचे वडील होते. ते दिनांक ०४.०४.२०२० रोजी मयत झाले. अर्जदार व गैरअर्जदार यांची आई नामे शेऊबाई सुंदरराव मेढे ह्या दिनांक २४.१०.२००५ रोजी मयत झालेल्या आहेत. अशा प्रकारे मयतास अर्जदार क्र. १ व २ आणि गैरअर्जदार यांच्याव्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाहीत. मयत सुंदरराव कृष्णाजी मेढे हे जिल्हा परिषद (प्राथमिक शिक्षक विभाग) अहमदनगर यांचेकडे शिक्षक म्हणून नोकरीस होते आणि ते नित्य वयोमानाप्रमाणे सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या नावे पंचायत समिती नगर तालुका यांचेकडे सातव्या वेतन आयोगाचे सेवानिवृत्त वेतनाचे चार हप्त्याची फरकाची रक्कम रू. ६३,७४०/– जमा आहे.

३) मयताच्या पश्चात अर्जदार क्र. १ व २ आणि गैरअर्जदार हेच त्यांचे एकमेव कायदेशीर वारस असल्याने त्यांनी सदर फरकाची रक्कम उचलण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नगर तालुका यांच्या कार्यालयात जाऊन मागणी केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना वारसाहक्क प्रमाणपत्र दाखल करण्यास सांगितले.

त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

४)        अर्जदार क्र. २ व गैरअर्जदार यांनी नि.क्र.२२ अन्वये पुरसिस दाखल करून अर्जदार क्र. १ यांच्या नावे वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याबाबत हरकत नसल्याचे कळविले आहे.

५)        सदर अर्जाच्या अनुषंगाने दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रामध्ये दिनांक ७ डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर प्रसिद्धीकरण देण्यात आले व अर्जास कोणाची हरकत असल्यास त्यांनी त्याबाबत कळवावे असे जाहीर करण्यात आले, परंतु अद्याप कोणीही या अर्जास हरकत घेतलेली नाही.

६)        अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुद्यास आणि निष्कर्षास अनुसरून उत्तरे मी निम्न प्रकारे देत आहे –

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | कोण मयतापश्चात वारसाहक्क प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहे? | अर्जदार क्र. १. |
| २. | कोणता आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

७)        अर्जदार यांनी अर्जातील म्हणण्यापृष्ठ्यार्थ वर्तमानपत्रातील जाहीर प्रगटन (नि.क्र.१२), मयत सुंदरराव कृष्णाजी मेढे यांचे मृत्यू प्रमाणपत्र (नि.क्र.१८), मयत शेऊबाई सुंदरराव मेढे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत, पंचायत समिती नगर कार्यालय यांनी दिनांक १९.०८.२०२२ रोजी वारसाहक्क प्रमाणपत्राची मागणी केलेबाबतचे पत्र (नि.क्र.१९), अर्जदार क्र. १, २ आणि गैरअर्जदार यांच्या आधार कार्डाच्या प्रती अशी कागदपत्रे दाखल केली आणि अर्जदार क्र. १ यांची साक्ष नि.क्र.२० अन्वये नोंदवून पुरावा

संपल्याबाबतची पुरसिस निशाणी २१ वर दाखल केली.

**<u>मुद्दे क्र. १ व २ करिता –</u>**

८)          अर्जदार क्र. १ व २ आणि गैरअर्जदार हे मयत सुंदरराव कृष्णाजी मेढे यांचे वारस असल्याबाबत वाद नाही. तसेच अर्जदार क्र. २ व गैरअर्जदार यांनी नि.क्र.२२ अन्वये पुरसिस दाखल करून अर्जदार क्र. १ यांच्या नावे वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याबाबत हरकत नसल्याचे कळविले आहे. दिनांक ०४.०४.२०२० रोजी सुंदरराव कृष्णाजी मेढे मरण पावले. मयताच्या नावे पंचायत समिती, नगर तालुका यांचेकडे सातव्या वेतन आयोगाचे सेवानिवृत्त वेतनाचे चार हप्त्याची फरकाची रक्कम रू. ६३,७४०/– जमा असल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. प्रस्तुत प्रकरणात जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यानंतर कुठलाच आक्षेप दाखल करण्यात आलेला नाही. सबब, अर्जदार क्र. १ यांची साक्ष आणि दाखल सर्व कागदपत्रे हे अबाधित राहिले. अशा परिस्थितीत अर्जदार क्र. १ व २ आणि गैरअर्जदार हे सर्व जरी मयताचे वारस असले तरी अर्जदार क्र. २ व गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ च्या हक्कात तसे वारसाहक्क प्रमाणपत्र देण्याची विनंती केल्यामुळे पुरसिस नि.क्र.२२ मधील ना हरकत लक्षात घेऊन मुद्दे क्र. १ व २ चे उत्तर मी वरील चर्चेस अनुसरून देऊन खालील आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत सुंदरराव कृष्णाजी मेढे यांचे अर्जदार क्र. १ व २ आणि गैरअर्जदार हे कायदेशीर वारस आहेत परंतु अर्जदार क्र. २ व गैरअर्जदार यांनी पुरसिस (नि.क्र.२२) मध्ये नमूद केलेल्या ना हरकतीमुळे मयताच्या नावे पंचायत समिती, नगर तालुका यांचेकडे सातव्या वेतन आयोगाचे सेवानिवृत्त वेतनाचे चार हप्त्याची फरकाची जमा असलेली रक्कम रू. ६३,७४०/– अर्जदार क्र. १ हे उचलण्यास पात्र आहेत.

३. वरील उल्लेखित रक्कम उचलण्यासाठी अर्जदार क्र. १ यांनी योग्य ते न्यायालयीन शुल्क नियमाप्रमाणे दिल्यास तसे वारसा हक्क प्रमाणपत्र त्यांच्या नावे देण्यात यावे.

४. वरील आदेशाप्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

SAJID ARIF SYED
Digitally signed by SAJID ARIF SYED
Date: 2023.03.20 16:29:01 +0530

दिनांक – २०.०३.२०२३
ठिकाण – अहमदनगर.

(साजिद आरिफ सैय्यद)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
अहमदनगर.
J.O. Code : MH01529